# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी § 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.
E-Mail: desk२a@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


तात्काळ/महत्वाचे

क्रमांक: २अ/एडीएम/२०१६/ ९५४
दिनांक : 20 JUL 2016

प्रति,
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता वाढीव प्रवेशक्षमता व नवीन अभ्यासक्रम मंजूर झालेल्या संस्थांच्या प्रवेशाबाबत संलग्नीकरणाची माहिती सादर करण्याबाबत

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांपैकी आपल्या अधिकारक्षेत्रात येत असलेल्या ज्या संस्थांना त्या चालवित असलेल्या अभ्यासक्रमाच्या शिखर संस्थेकडून (उदा.AICTE,PCI,COA) नवीन अभ्यासक्रमास परवानगी, प्रवेशक्षमतेत वाढ याकरिता परवानगी मिळालेली आहे ,परंतू त्या अभ्यासक्रमाचा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत संलग्नीकरणाअभावी समावेश करण्यात आलेला नाही अशा सर्व संस्थांनी त्यांना मंजूर झालेल्या नवीन अभ्यासक्रम/ प्रवेशक्षमतेत वाढीबाबत विद्यापीठाचे संलग्नीकरण असल्याची कागदपत्रे अथवा संलग्नीकरणासाठी संबंधित विद्यापीठांकडे केलेल्या अर्जाची प्रत संस्थेतील जबाबदार प्रतिनिधीसोबत संचालनालयास दिनांक २२.७.२०१६ सकाळी ११.०० वाजेपर्यंत प्रत्यक्ष सादर करण्यास कळविण्यात यावे. नवीन अभ्यासक्रम ,प्रवेश क्षमता वाढ झालेल्या संस्थांचे शासन निर्णय संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले आहेत.

ज्या संस्था अशा प्रकारे प्रत्यक्ष विहीत दिनांकात माहिती सादर करणार नाहीत अशा संस्थांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या प्रवेश फेरीत समावेश करण्यात येणार नाही याची जाणीव आपल्या अधिनस्त संबंधित संस्थांना करून देण्यात यावी.

(डॉ.सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : कार्यासन क्रमांक २ आणि माहिती तंत्रज्ञान कक्ष (कार्यासन ३) ,मुख्य कार्यालय,मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता

D:\Budage\२०१६-१७\General Correspondence\affiliation to new course and increasing intake.docx

क्रमांक:- विकाअ/शिदीला/२०१६/ 2496
सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती
दिनांक:- 21/7/16

प्रत :- प्राचार्य, सर्व संबंधित संस्था यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रामध्ये नमुद कागदपत्रांसह नमुद दिनांकास तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई येथे आपल्या संस्थेतील जबाबदार प्रतिनिधीस हजर राहण्याबाबत कळवावे.

सहसंचालक